1. भविष्यात घडणाऱ्या किंवा कदाचित कधीच न घडणाऱ्या विपत्तीची चिंता करून आपण केवढी मोठी किंमत चुकवत असतो.

2. प्रारब्धाचा व पुरूषार्थाचा मार्ग भिन्न आहे, परंतु जेव्हा त्यांची भेट होते, अद्भुत यश प्राप्त होत असते.

3. ज्याप्रमाणे अंधारात मनुष्याची पडछाया त्यांची साथ सोडून देते, त्याप्रमाणे दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेल्या मनुष्याचे आप्तेष्ट त्याची साथ सोडून देतात.

4. धैर्य आणि विनयशीलता हे असे गुण आहेत की, ढोंगी लोकांना त्यांची नक्कल करता येत नाही.

5. मनुष्याला एकदा बोललेले खोटे पचविण्यासाठी अनेकदा खोटे बोलावे लागते.

6. पैसा हे मद्य आहे. सेवा हे अमृत आहे.

7. श्रीमंतीच्या हवेल्या चांगल्या आहेत म्हणून आपल्या लहान झोपड्या कोणी पाडतात का?

8. भुकेने कासावीस झालेले पोट नि अन्यायाने तडफडणारे मन यातूनच क्रांतीचा जन्म होतो.

9. तुमच्याने पुढे जाववत नसेल तर पुढे जाऊ नका. पण पुढे जाणाऱ्याला मागे खेचू नका.

10. भाग्य म्हणजे जिंकावयाची बक्षिसे ! त्याचा रस्ता म्हणजे धैर्य ! आणि संधी म्हणजे रस्त्याच्या बाजूला सावलीत जे दडपलेले असते ते.

11. जसे मीठ अन्नाला रूची आणते. तशी व्यक्तीची भावना ही निर्गुणाला गुणाची पुटं चढवीत असते.

12. समोर अंधार असला, तरी त्याच्या पलीकडे प्रकाश आहे हे लक्षात घ्या.

13. अधर्म, अनीती, अनाचार यांच्या साहाय्याने मिळविलेला जय पराजयापेक्षाही अधिक लांच्छनास्पद आहे.

14.संस्कृती म्हणजे आपल्या मनावर ताबा व दुसऱ्याच्या दु:खाची जाणीव होय.

15.घणाचे घाव बसले की हिऱ्यासारख्या दिसणाऱ्या गारेचे पाणी होते, पण घणाचे आघात खऱ्या हिऱ्याचे पाणी पालटू शकत नाहीत.

16.शत्रूशी मित्रत्व राखणे ही प्रेमाची खरी कसोटी आहे. तो गुण आहे; कारण त्यात श्रम आहेत. तो खरा पुरूषार्थ आहे; कारण त्यात खरी बहद्दुरी आहे !

17.स्वत:ला जिंकायचे असेल तर डोक्याचा उपयोग करा; इतरांना जिंकायचे असेल तर हृदयाचा उपयोग करा.

18.ज्याला काटे पेरायचे आहेत, त्याने अनवाणी चालता उपयोगी नाही.

19.तुम्ही आपल्या कर्माचा पडदा काचेसारखा स्वच्छ कराल; तर त्यातून तुम्हाला परमेश्वर दिसेल. गोणपाटासारखा कराल, तर त्यातून परमेश्वर दिसणार कसा?

20.कीर्ती नदीप्रमाणे उगमस्थानी अत्यंत अरूंद असते; परंतु दूरवर गेल्यानंतर ती अत्यंत विशाल होते.

21.चिंता म्हणजे मानवी जीवनाला चढलेला गंज आहे. हा चिंतारूपी गंज मनुष्याच्या जीवनातील झळाळी नष्ट करतो व मनुष्याला दुर्बल बनवतो.

22.धनरूपी अथांग सागरात तुमची इज्जत, हृदय व सत्य बुडून जाऊ शकते.

23.जेव्हा आम्ही नम्रतेने लहान होतो, तेव्हा आम्ही महानतेच्या निकट जातो.

24.घाम गाळल्याशिवाय मिळालेली सुखशांती टिकाऊ नसते.

25.स्वार्थरहित खरीखुरी सेवा हीच खरी प्रार्थना.

26. जो तुमची सेवा करतो, त्याच्या ऋणातून तुम्ही केवळ पैसे मोजून मुक्त होऊ शकत नाही. सेवेचे ऋण जगात फक्त दोनच मार्गांनी फेडता येते; एक प्रेमाने व दुसरे सेवेने.

27. दु:खापेक्षा उत्सुकताच अधिक रक्त आटवते.

28. लबाडी ही तोकड्या चादरीसारखी असते. तोंडावर ओढून घ्यावी तर लगेच खाली पाय उघडे पडतात.

29. प्रतिभा आणि पांडित्य यांचा संगम सर्वश्रेष्ठ होय.

30. दुसऱ्यासाठी डोळयात उभे राहिलेले अश्रू हे मनुष्याच्या आत्मविकासाच्या वेलीवरील फुललेली फुलेच होत.

31. आपण पक्ष्याप्रमाणे आकाशात विहार करावयास शिकलो; माशाप्रमाणे पाण्यात तरंगावयास शिकलो; परंतु अद्याप माणसाप्रमाणे जगात वावरण्यास मात्र शिकलो नाही.

32. पीडित ह्रदयाचा दाह शांत करणाऱ्या आत्मियतेच्या एकाच दृष्टक्षेपाची किंमत कुबेराच्या संपत्तीपेक्षा जास्त आहे.

33. बुध्दी हे आत्मदर्शनाचे महाद्वार आहे. बुध्दी उडाली की आत आत्मा उघडा आहे.

34. क्रोधामुळे प्राप्तीचा, मानामुळे विनयाचा, मायेमुळे मित्राचा व मोहामुळे सर्वांचा नाश होतो.

35. समाजाचा कौल हा पुष्कळ वेळा भाषणापेक्षा मौन व्रतानेच अधिक प्रभावीप्रमाणे व्यक्त केला जातो.

36. सतर्कतेने संधीची वाट पाहाणे, साहसाने आणि कौशल्याने संधी प्राप्त करणे, शक्ती आणि दृढतापूर्वक संधीचा फायदा घेऊन कार्य यशस्वी करणे, हेच मनुष्याला यशस्वी करणारे गुण !

37. परमेश्वराने आपणास दोन कान व एक तोंड दिले आहे. त्याचप्रमाणे आपण त्यांचा उपयोग केला पाहिजे.

38.वाचनाने मनुष्याला आकार येतो, सभेमुळे तो प्रसंगावधानी, तत्पर होतो आणि लिखाणामुळे तो सर्वांगीण होतो.

39.विचार हेतूकडे नेतो. हेतू कृतीकडे. कृतीमुळे सवय लागते. सवयीमुळे स्वभाव बनतो व स्वभावामुळे साध्य प्राप्त होते.

40.सद्‌गुणांसाठी दुसऱ्याकडे बघा व दुर्गुणांसाठी स्वत:वर नजर ठेवा.

41.सत्यामुळे असत्य, प्रेमामुळे राग व आत्मत्यागाने जुलूम नाहीसा होतो, हा अविनाशी नियम सर्वांना लागू आहे.

42.जन्मामुळे नव्हे तर केवळ सद्‌गुणांमुळेच आपण थोर बनतो. थोर कृती हीच थोर मनाची साक्षीदार आहे.

43.सुखापेक्षा दु:खामुळेच दोन हृदये अधिक जवळ येतात. समदु:ख हे समआनंदापेक्षा अधिक बलशाली असते.

44.स्तुतीने चांगली माणसे सुधारतात, तर वाईट माणसे बिघडतात.

45.सत्तेची हाव हा एक अत्यंत प्रबळ विचार आहे.

46.चांगल्या धनुर्धराची ओळख त्याने धरलेल्या नेमावरून समजते. जवळ बाळगलेल्या बाणावरून नाही.

47.दु:खद घटना येताना गरूडाच्या भरारीने येतात आणि जाताना मात्र मुंगीच्या पावलंनी जातात.

48.जीवन हा एक धुळीने माखलेला रस्ता आहे. त्यावर अगदी जपुन पावले टाकली पाहिजेत.

49.उत्पत्तीशिवाय स्थिती नाही, स्थितीशिवाय लय नाही, लयावाचून पुन: उत्पत्ती नाही.

50.क्वचित अर्थ न कळला, तरी नित्य पठनानेही आपली वाणी पवित्र होते व हळू हळू मन शुध्द होत राहाते.

51.मनुष्याला राग आला की तो किती खोटे बोलतो याला सुमारच नसतो. कारण रागाच्या भरात त्याची विचारशक्ती व सत्याबद्दलची निष्ठा नाहीशी होऊन गेलेली असते.

52.दाट धुक्याने क्षणभर दृष्टीला दिसत नाहीसा होणारा पर्वत जेथल्या तेथे व जसाच्या तसाच राहतो. धुके लवकरच निघून जाते.

53.जी माणसे आपल्या कुवतीप्रमाणे इच्छा करतात, सामर्थ्यानुसार काम करतात व कुणाचा अनादर करीत नाहीत; ती माणसे कर्तव्यदक्ष समजावीत.

54.विश्रांती मिळविण्याची धडपड करण्यातच माणसे थकून जातात.

55.स्वत:च्या वाट्याला जरी काटे आले असले, तरी दुसऱ्याला गुलाबाची सुंदर फुले देता येतात.

56.पापी माणसे तोंडानं बळकट असतात; पण अंत:करणांनं दुबळी असतात.

57.आत्मविश्वास, इच्छाशक्ती व दृढ निर्णय ह्या त्रिवेणी संगमाने जीवनाचा झरा जलद वाहत जातो.

58.स्वार्थाची ढाल आणि दुष्कृत्यांची तलवार हाती घेऊन लढणारा वीर स्त:च्या मरणाला कारणीभूत होतो.

59.कीर्तीरूपी दंवबिंदूंनी हृदयरूपी पान जास्त चमकत राहाते.

60.दु:खी माणासाला मदत करण्यासाठी लांबवलेला एक हात, प्रार्थनेसाठी जोडलेल्या दोन हातांपेक्षा अधिक उपयुक्त आहे.

61.मृत्यू हा माणसाला दिलेला शाप आहे, तर प्रीती हा उ:शाप आहे.

62. बहीण-भावाच्या प्रेमात पवित्रता असते; तर पती-पत्नीच्या प्रेमात मादकता असते. प्रेमाचे पावित्र्य शांती देते, तर मादकता मनुष्याला व्याकुळ बनवते.

63. चिंतेप्रमाणे शरीराचे शोषण दुसरे कोणीही करू शकत नाही.

64. प्रतिभा ही चारित्र्याची दासी आहे.

65. विवाह-होमात जर खरोखरी कसली आहुती द्यावी लागत असेल; तर ती जीविताकडे पाहण्याच्या साहसी वृत्तीची.

66. दोन अपूर्ण माणसांना एकमेकांना पूर्ण करण्याची जी विलक्षण तळमळ लागते तिचेच नाव प्रीती.

67. नीतीचा खून समाजाला पाहवत नाही. पण माणसाचे खून समाज हसतमुखाने पाहतो. माणसासाठी नीती असते. नीतीसाठी माणूस नसतो.

68. गुलाबाला काटे असतात म्हणून पिरपिरत बसण्यापेक्षा काट्यांना गुलाब असतो म्हणून मजा मारावी हे उत्तम !

69. जगात पैशासाठी जितक्या लबाड्या केल्या जातात, त्यापेक्षा जास्त लबाड्या कीर्तीसाठी व नेतृत्वासाठी केल्या जातात.

70. कीर्ती हे उद्याचे सुंदर स्वप्न आहे, पण पैसा ही आजची भाकरी आहे.

71. जो समाजास नेत्राने, मनाने, वचनाने व आचरणाने खूष करतो, त्याच्यावर समाज खूष असतो.

72. कोणतेही तत्व जोपर्यंत स्वत:च्या आड येत नाही, तोपर्यंत त्याची पूजा करायला लोक तयार असतात; पण ज्या क्षणी ते त्यांच्यावर उलटते, त्या क्षणी ते त्यला दूर भिरकावून देतात.

73. तासभराचे ध्यान हे वर्षभर केलेल्या पूजेअर्चेहून श्रेष्ठ होय.

74.अपराधावाचून क्षमा करणे आणि पराक्रमावाचून बक्षिस देणे, या दोन्ही गोष्टी सारख्याच वेडगळपणाच्या आहेत.

75.सज्जन माणूस म्हणून जन्माला येणे हा योगायोग आहे; पण सज्जन म्हणून मरणे आयुष्यभरची कमाई आहे !

76.उच्चारावरून विद्वत्ता, आवाजावरून नम्रता व वर्तनावरून शील समजते.

77.अज्ञ, श्रध्दाहीन व संशयखोर मनुष्याला कधीही सुख मिळत नाही.

78.दिलदार हृदयाशिवाय धनवान मनुष्यदेखील भिकारीच असतो.

79.हृदयात अपार सेवा भरली की, सर्वत्र मित्रच दिसतात.

80.जेव्हा मित्रच मित्राला बरबाद करतात, तेव्हा पेटलेल्या हृदयात शत्रुत्व धगधगते.

81.झाडाला पेटवून त्यांची राख करण्यास अजिबात वेळ लागत नाही; पण तीच झाडे रूजवून वाढविण्यास खूप काळ लागतो.

82.दान घेण्यात वाटणारे सुख हे क्षणिक असते; परंतु दान देऱ्याने जे सुख प्राप्त होते ते जीवनभर पुरत असते.

83.चारित्र्य मनुष्याला बनवत नाही, परंतु मनुष्य चारित्र्य निर्माण करीत असतो.

84.समाधान म्हणजे एक प्रकारचे वैभव असून ते अंत:करणाची संपत्ती ज्याला ही संपत्ती सापडते तो खरा सुखी होतो.

85.दुष्कृत्याची कबुली हीच सत्कृत्याचा प्रारंभ ठरतो.

86.दुसऱ्यावर अन्याय करण्यापेक्षा तो अन्याय आपण स्वत: सहन करणे जास्त चांगले असते.

87.हातातून जोराने फेकलेला दगड जसा परत घेता येत नाही, तसे उच्चारलेल्या शब्दांच्या बाबतीत होऊन दुष्परिणाम भोगावे लागतात.

88.निसर्गावर तुम्हाला प्रभुत्व हवे असल्यास निसर्गाचे नियम नीट पाळलेच पाहिजेत.

89.आपले जीवन सार्थ करायचे असल्यास, स्वत:चा विचार दुय्यम प्रतीचे ठरवून इतरांचे हित पाहावे व त्याला जपावे.

90.नशीब दारापाशी येते व शहाणपण घरात आहे की नाही याची चौकशी करते.

91.कृतीशिवाय जे बोलतात, त्यांची शेवटी फसगत होते. बोलावे असे वाटते तोपर्यंत बोलणे थांबविणे जरूर आहे.

92.यशामुळे मतिभ्रष्टता आली की, अपयशाची गाठ पडलीच !

93.ज्या अपेक्षा आपण पुरवू शकत नाही, त्या निर्माण करू नयेत.

94.सावधगिरी हीच मनुष्यास भित्रे बनविते.

95.ईश्वराने बुध्दीहून उत्तम अथवा अधिक पूर्ण अथवा सुंदर असे दुसरे काही निर्मिले नाही.

96.बुध्दी आणि भावना यांचा समन्वय म्हणजेच विवेक.

97.झाडाच्या पानावरील दंवबिंदूप्रमाणे मानवी जीवन हे काळाच्या किनाऱ्यावर नाच करीत असते.

98.त्याग हा जीवन-मंदिराचा कळस आहे.

99.जीवन ही लढाई आहे. जीवन हा यज्ञ आहे. जीवन हा सागर आहे. प्रीती आणि पराक्रम हेच जीवनाचे डोळे !

100. जीवन विफल होण्याच्या भीतीसारखा दुसरा शाप नाही.

101. गरज कायदा ओळखत नाही.

102. सुधारणा म्हणजेच ज्याच्यामुळे मनुष्य आपले कर्तव्य बजावीत राहतो ते आचरण.

103. मोठमोठी कामे ही ताकदीने केली जात नाहीत, तर ती सहनशक्तीने होतात.

104. थोरांच्या दुर्गुणांचीदेखील गुण म्हणून वाखाणणी केली जाते.

105. मानवाच्या खोलवर अशा अनुभवांना फुटलेली वाचा म्हणजे धर्म.

106. कोवळे स्मित म्हणजे दु:खावरचे मलम.

107. जे अंत:करणातून निपजते तेच अंत:करणाला जाऊन भिडते.

108. आत्म्याची सुधारणा हा सर्व सुधारणांचा आत्मा आहे.

109. कळकळ ही जीवनाची सुरूवात करते; तर त्याग त्याचा शेवट करतो.

110. कर्माने, प्रज्ञेने वा धनाने नव्हे; त्यागानेच अमृततत्त्वाचा लाभ होईल.

111. पायदळी चुरगळलेली फुले, चुरगळणाऱ्या पायाला आपला सुगंध अर्पण करतात. खऱ्या क्षमेचे कार्य हेच आहे.

112. अभिमानाचा त्याग करणारा माणूस लोकांच्या प्रेमास पात्र होतो. राग सोडलेल्यास दु:ख होत नाही. अभिलाषा सोडलेला माणूस श्रीमंत होतो व लोभ सोडलेला खरा सुखी होतो.

113. नुसत्या गंमतीला किंमत नाही, तर हिंमतीला आहे.

114. आवड असावी म्हणजे सवड आपोआप होते.

115. खरा धर्म हा बड्या लोकांच्या चैनीची वस्तू नसून, सर्व लोकांची ती मूलभूत गरज आहे.

116. जीवन म्हणजे आश्चर्याची मालिकाच ! उद्याचा रागरंग आपणास आज कधीच समजणार नाही.

117. जो स्वत:च कुणाचा तरी गुलाम असतो, त्यालाच दुसऱ्यावर हुकमत गाजवाविशी वाटते.

118. आजचा पुरूषार्थ उद्याचे भाग्य ठरणार आहे.

119. गर्वाने देव दानव बनतात, तर नम्रतेमुळे मानव देव बनतो.

120. धैर्य ही आनंदाची चावी आहे.

121. अनेक मूल्यवान पदार्थांनी भरलेले विश्व जरी मनुष्याला दिले, तरी त्याचे समाधान होणार नाही, कारण मोह हा अनिवार्य आहे.

122. चालीरीती म्हणजे सद्गुणांच्या पडछाया.

123. त्यागाशिवाय समता नाही, समतेशिवाय शांती नाही आणि शांतीवाचून प्रगती नाही.

124. त्यागाची शक्ती हेच अलौकिकत्व.

125. परमार्थामध्ये अधिकार कोणी कोणाला देऊन येत नसतो. आपला अधिकार आपल्या कृतीवर अवलंबून असतो.

126. लांब जीभ आयुष्य कमी करते.

127. ज्ञान दाखविण्यापेक्षा, अज्ञान लपविणे कठीण असते.

128. कला ही भूतकाळाची कन्या, वर्तमानकाळाची पत्नी आणि भविष्यकाळाची माता असते.

129. अहंकार हा तपसाधनेचा महान शत्रू आहे.

130. विचार परिपक्व झाले की शब्दांचे रूप घेऊन कागदावर उतरवता येतात.

131. ज्ञानाशिवाय मनुष्य आंधळा आहे आणि कलेशिवाय जीवन नीरस आहे.

132. भूतकाळासाठी रडण्यापेक्षा वर्तमानकाळाशी लढण्यात आणि भविष्याच्या शिखरावर चढण्यातच खरा पराक्रम आहे.

133. प्रतिभा ही अनंत परिश्रमाने सामावलेली असते.

134. सत्याचा शेवट सुख-समाधानाच्या वाटेने जातो.

135. अचल प्रीतीची किंमत चंचल संपत्तीने कधी होत नाही.

136. ढोंग म्हणजे सद्‌गुणापुढे दुर्गुणाने स्वीकारलेली हार आहे.

137. दु:ख अनावर झाले की माणसाला हसू येते, आणि सुखाचा अतिरेक झाला की रडू येते.

138. लबाडी केल्यामुळे तात्पुरते फायदे होतात, पण कायम स्वरूपाच्या कल्याणाचा नाश होतो.

139. पैशावर विश्वास ठेवण्यापेक्षा विश्वासावर पैसा ठेवावा.

140. कामक्रोधांना आपसात लढवून मारणे यात ज्ञानाचे कौशल्य आहे.

141. महत्वाकांक्षेला किल्ली दिल्यावर संकटांचे, नशिबाचे काटे आपोआप फिरतात.

142. माणूस जगात शोभून दिसतो तो मोत्यांच्या हारांनी नव्हे, तर घामाच्या धारांनी.

143. खुशामत जो करतो व जो करून घेतो ते दोघेही आपले व्यक्तिमत्व भ्रष्ट करतात.

144. समजूत व विवेक यांचा साहजिक परिणाम संभाव्य आपत्तीविरूध्द वेळेवर उपाय योजणे हा होय.

145. चांगली, योग्य पत्नी म्हणजे कुटुंबाची शोभा व घराची लक्ष्मी असते.

146. मनुष्याच्या मागे फक्त त्याचा चांगुलपणा राहतो, बाकी सर्व नष्ट होते.

147. हिंमत ही अंत:करणातून निर्माण होणारी वस्तू आहे; संपत्तीच्या आकड्यात निर्माण होणारी नाही.

148. नावे ठेवणे सोपे आहे; परंतु नाव कमावणे अवघड आहे.

149. हे जीवन म्हणजे भावी जीवनाची मशागत होय. तिथे पीक घेता यावे म्हणून भली लागवड करा.

150. शेकडो थोर विचार, भावना व आकांक्षा मनात बाळगण्यापेक्षा; एकच सत्कृत्य आपल्या हातून झाले तर त्याचे मूल्य अधिक आहे.

151. क्रोधाच्या एका क्षणी संयम राखला तर पश्चात्तापाचे शंभर दिवस येत नाहीत.

152. दिवा अंधार खातो, त्यामुळे काजळीची उत्पत्ती होते. तद्वतच आपण ज्या प्रकारचे अन्न खातो, त्याच प्रकारचे आपले आचारविचार होतात.

153. वाढत्या वयामुळे सुरकुत्या पडणारच असतील तर त्या शरीरावर पडोत, मनावर नकोत.

154. आपत्ती नेहमी हानी करण्यासाठी येते असे नव्हे !

155. आळस इतका सावकाश प्रवास करतो की दारिद्र्य त्यास ताबडतोब गाठते.

156. हाताचे भूषण दान करणे हे आहे. कंठाचे भूषण सत्य बोलणे हे आहे. शास्त्रवचने ऐकणे हे कानाचे भूषण आहे. इतके असताना बाह्य आभूषणांची गरजच काय?

157. राईएवढा दोष लपविण्याने तो दोष पर्वताएवढा मोठा होतो; पण तो दोष कबूल केल्याने नाहीसा होतो.

158. स्वर्ग किंवा नरक स्वत:च्या कृत्यांनी बनविता येतो, म्हणूनच सत्कर्मे करा.

159. जीवन म्हणजे फसवणूक ! आशेने मूर्खात काढल्यामुळे ह्या फसवणुकीला आपण कौल देतो. उद्या हा कालच्यापेक्षा जास्तच फसवणूक करतो.

160. घर ही स्वातंत्र्यभूमी आहे. जगामध्ये ह्याच जागेवर मनुष्य वाटेल ते प्रयोग करू शकतो.

161. संभाषण करताना ज्याचा मागून पश्चाताप करावा लागेल, असा एकही शब्द उच्चारता कामा नये.

162. लहान लहान बोबड्या बाळांच्या ओठातून व अंत:करणातून दिसून येणारा थोर परमेश्वर म्हणजेच आई !

163. जीवन एक पुष्प आहे, प्रेम हा त्याचा सुगंध आहे.

164. पुस्तके म्हणजे तुमचे मन निर्मळ करणारा साबण आहे.

165. जीवन हा हास्य आणि अश्रू यांचा सुरेख संगम आहे.

166. जितक्या अपेक्षा कमी, त्या प्रमाणात मनाला शांतता अधिक लाभते.

167. खरा सामर्थ्यवान तोच की, जो दुसऱ्याची चूक झाली तरी त्याला क्षमा करून कायमचा आपला करतो.

168. निरोगी शरीर व निष्पाप मन ही दोन असली म्हणजे त्यात सर्व काही आले.

169. आपली जसजशी प्रगती होत जाते, तसतशा प्रगतीच्या मर्यादा जास्त जास्त जाणवू लागतात.

170. कर्ज काढणे ही एखादी जड वस्तू डोंगरमाथ्यावरून खाली लोटून देण्याइतके सोपे आहे, परंतु ते फेडणे म्हणजे तीच वस्तू खालून डोंगरमाथ्यावर वाहून नेण्याइतके कष्टप्रद आहे.

171. मूर्ख मनुष्य आपले हृदय जिभेवर ठेवतो. तर शहाणा आपली जीभ हृदयात लपवून ठेवतो.

172. चांगल्यातला चांगुलपणा जाणायलासुध्दा अंगी चांगुलपणा असावा लागतो.

173. बुडणाऱ्याला सहानुभूती म्हणजे त्याच्याबरोबर बुडणे नव्हे.

174. स्वत:च्या बुध्दीनं चालून चूक करण्यापेक्षा दुसऱ्यानं दाखविलेल्या मार्गानं चालणं अधिक चांगलं.

175. जे तलवार चालवतील ते तलवारीनेच मरतील.

176. अहंकारापेक्षा नम्रतेचे मोल महान आहे.

177. पायदळी चुरगाळली जाणारी फुले चुरगाळणाऱ्याच्या पायांना मात्र सुगंध देतात.

178. मैत्रीच्या रोपट्याला नेहमी प्रेमरूपी पाण्याचे सिंचन आवश्यक असते.

179. विद्येचे फळ म्हणजे चारित्र्य आणि सदाचार.

180. मनाने संत बनायला पाहिजे, नुसते बाहेरून संत बनणे हे योग्य नाही.

181. भुतं जगात नसली तरी ती माणसाच्या मनात असतात.

182. कीर्तीची नशा दारूच्या नशेपेक्षा भयंकर असते. एक वेळ दारू सोडणे सोपे आहे; परंतु कीर्तीचा हव्यास सोडणे अत्यंत कठीण आहे.

183. दुष्टांच्या संगतीने सदाचार लोप पावतो.

184. जो चांगल्या वृक्षाचा आश्रय घेतो, त्याला चांगली छाया लाभते.

185. आशा म्हणजे मानवी जीवनाचा मुख्य आधार होय.

186. जो सदाचारी असतो, तो देवळाच्या प्रवेशद्वाराशी पोहोचतो व जो सर्वांवर मन:पूर्वक प्रेम करतो तो देवळाच्या गाभाऱ्यात पोहोचतो.

187. पैशाने सर्व काही मिळते असे ज्यांना वाटले, ते साहजिकच स्वत: पैशाकरिता काहीही (भलेबुरे) करतील असे गृहीत धरावे.

188. लीनता व विनयशीलता ह्या धार्मिकतेच्या दोन शाखा आहेत.

189. जेथे बुध्दीचे क्षेत्र संपते, तेथे श्रध्देचे क्षेत्र सुरू होते.

190. त्यागामध्ये शांतीचा निरंतर वास असतो.

191. वेदशास्त्रपारंगत असणारा गरीब चांगला; परंतु धनवान मूर्ख फार वाईट.

192. ज्यांना आपण पराजीत होणार आहोत अशी भीती असते, त्यांचा पराभव निश्चित आहे असे समजावे.

193. मनाच्या निर्मलतेशिवाय निर्भयता निर्माण होत नाही.

194. तुमचे सौख्य तुमच्या विचारांवर अवलंबून आहे.

195. परमेश्वर खऱ्या भावनेला, उत्कट निश्चयाला साहाय्य करतो.

196. सूर्य सर्व प्रकारच्या चांगल्या-वाईट वस्तूंवर प्रकाश टाकतो, परंतु स्वत: मात्र पूर्णपणे शुध्द राहातो, अशा सूर्यप्रकाशाप्रमाणे आपण आपले चारित्र्य घडविले पाहिजे.

197. इमानीपणामुळे गुलमगिरीतदेखील उदारतेचा अंश चमकतो.

198. जर तुम्ही तुमच्या चुकांकडे डोळेझाक केली तर सत्य तुमच्याकडे पाठ फिरवील.

199. सामर्थ्य हे सांगण्याची अथवा पाहण्याची वस्तू नसून, वेळ आल्यावर कृती करण्याची ती गोष्ट आहे.

200. समुद्राचा तळ शोधल्याशिवाय मोती मिळत नाहीत.

201. दु:ख आणि सुख हे अंध:कार आणि प्रकाश याप्रमाणे पाठलाग करीत असतात.

202. दारिद्रयाची गंगोत्री पैशाच्या अभावात नसून ती माणसाच्या विचारात आहे.

203. काही रोगांवरील उपाय त्या रोगांपेक्षाही भयंकर असतात.

204. जी उदात्त कृत्यें लपलेली असतात, त्याच कृत्यांचा जास्त उदोउदो होतो.

205. सर्व विजयांमध्ये स्वत:च्या मनावरील विजय हा सर्वात महान होय.

206. व्यक्तीप्रमाणे राष्ट्रे जन्माला येतात आणि नाहीशी होतात; परंतु संस्कृती मरू शकत नाही.

207. संस्कृती ही एक चळवळ आहे आणि परिस्थितीवादी एक जलपर्यटन आहे; परंतु बंदी नव्हे.

208. प्रार्थनेमुळे देव बदलत नाही; तर ती प्रार्थना करणारी व्यक्ती बदलत असते.

209. आत्मविश्वास हे वीरत्वाचे सार आहे.

210. भय म्हणजे मनुष्याचे अंत:करण, त्याला त्याच्या अपराधाबद्दल देत असलेला कर आहे.

211. हजार सूर्य एकत्रित केलेत, तरी सत्यरूपी सूर्याची बरोबरी करता येणार नाही.

212. आशावादी अपयश विसरण्यासाठी कष्ट करतो, हसतो आणि निराशावादी हसण्याचेच विसरून जातो.

213. सुखदु:खातील भेद म्हणजे सुखाला भागीदार मिळाले तर ते वाढत राहाते आणि दु:खात जर कोणी वाटेकरी झाले तर ते कमी होते.

214. गेलेल्या संधीबद्दल रडत बसण्यापेक्षा येणाऱ्या संधीचे स्वागत करा.

215. तुम्ही स्वत:ला मेंढरू बनविल्यावर लाडंगा तयारच असतो.

216. चिखलात उगवलेली सर्वच फुले काही कमळाची नसतात.

217. मोठी मने तत्त्वविचारांची चर्चा करतात, सामान्य मने घटनांची चर्चा करतात; तर क्षुद्र मने व्यक्तींची चर्चा करतात.

218. नास्तिक बरा पण दांभिक वाईट. पहिला प्रामाणिक असतो, तर दुसरा प्रामाणिकतेचं ढोंग करतो.

219. पैसा बोलतो, तेव्हा सत्य मुकं असतं.

220. सुखापेक्षा दु:खामुळे होणारी ज्ञानप्राप्ती श्रेष्ठ दर्जाची असते.

221. तुमचा शेजारी म्हणजे तुमचाच आरसा होय.

222. झोपडपट्टी ही संस्कृतीचे मोजमाप आहे.

223. वासना उपभोगल्याने तृप्त होत नाहीत, उलट चेकाळतात.

224. धनवान असणारा कंजुष मनुष्य, गरीबापेक्षा अधिक दरिद्री असतो.

225. सत्य आणि न्याय ह्याहून कोणताच धर्म मोठा नसतो.

226. मानवी जीवनातील अर्धी दु:खे परस्परातील दया, परोपकार आणि सहानुभूतीने कमी करता येतात.

227. लाकूड जळते कारण त्यामध्ये जळण्याजोग्या वस्तू असतात. तसेच मनुष्य सत्कीर्ती संपादतो कारण त्यासाठी आवश्यक गुण त्याच्यामध्ये असतात.

228. प्रामाणिकपणे केलेल्या कामात मान असतो.

229. जी हानी आपण करतो आणि जी हानी आपण सहन करतो - या दोन्ही गोष्टी एकाच तागडीत तोलता येत नाहीत.

230. ज्या वेळी न्यायाधीशच चोऱ्या करतात, त्या वेळी चोरांना चोरी करण्याचा अधिकारच प्राप्त होतो.

231. प्रार्थनेने इच्छाशक्ती वाढते; इच्छाशक्ती वाढली की प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचे सामर्थ्य येते, हुरूप येतो, उत्साह वाढतो, जीवन जगावेसे वाटते.

232. बुध्दीपेक्षाही कर्म करताना स्वस्थ मनाची आवश्यकता असते. मनस्वास्थ्य नसेल तर बुध्दी असूनही कर्म नीट होऊ शकत नाही.

233. जीवनात आपले ध्येय कितीही दूरचे असले, तरी त्याच्याकडे जायचे म्हणजे प्रथम एक पाऊल टाकूनच प्रारंभ करावा लागतो व तसेच करीत गेले म्हणजे हळूहळू आपण ध्येयाजवळ पोहोचतो.

234. समजेल अशा तऱ्हेने सत्य सांगत गेले, तर कोणालाही त्याविषयी अविश्वास वाटत नाही.

235. जगातील निम्मी दुष्कृत्ये भित्रेपणामुळे घडत असतात आणि जो असत्य बोलावयास घाबरतो तो या जगात दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला घाबरत नसतो.

236. जीवन म्हणजे एक अनंत आव्हान, प्रदीर्घ साहस व पात्रतेची खरीखरी कसोटीच होय.

237. एखादी व्यक्ती जे बंधन स्वत:वर आपल्या बुध्दीने लादून घेते, ते आचरण्यात तिला एक प्रकारचा आनंद असतो, अभिमान वाटतो.

238. प्रार्थनेमुळे अहंकार नष्ट होत राहतो.

239. यौवन आणि आशा यांची जोडी अभंग आहे.

240. जगण्याच्या इच्छेत मरणाचे बीज आहे. जगण्याची इच्छा गेली म्हणजे मरण मेले.

241. हृदयविना केलेली ओठांची हालचाल व्यर्थ आहे.

242. एखाद्या हल्ला करणाऱ्या शत्रूबद्दल काळजी करण्यापेक्षा, एखाद्या स्तुती करणाऱ्या मित्राबद्दल सावधानता बाळगणे इष्ट होय.

243. जो पाप करतो तो माणूस, ज्याला त्याबद्दल दु:ख वाटते तो संत, जो त्याबद्दल फुशारकी मारतो तो सैतान.

244. सद्‍गुणाला कधीही वार्धक्य येत नाही.

245. देवळे आणि धर्म नष्ट झाल्यानंतर ईश्वर हा स्वत:चे मंदिर मानवाच्या हृदयात उभारत असतो.

246. शरीर पाण्यामुळे, मन सत्यामुळे व आत्मा ज्ञानामुळे पवित्र राहातो.

247. दानशूर व्यक्तीच्या धनसंचयातील धन कधीच कमी होत नाही.

248. सर्व कलांमध्ये `जीवन जगण्याची कला' हीच श्रेष्ठ कला आहे.

249. जोपर्यंत मनुष्याला कामिनी व कांचनाचा मोह सुटत नाही, तोपर्यंत त्याला परमेश्वराचे दर्शन होऊ शकणार नाही.

250. सत्य, क्षमा, संतोष, ज्ञान, धैर्य, शुध्द मन आणि मधुर वचन म्हणजे प्रार्थनेची प्रार्थना होय.

251. दृढ विश्वास हाच महान कार्याचा जनक आहे.

252. ज्ञान हे पैशापेक्षा श्रेष्ठ आहे, कारण पैशाचे रक्षण तुम्हाला करावे लागते; परंतु ज्ञान तुमचेच रक्षण करते.

253. खरा आनंद सुखसोयीमुळे, संपत्तीमुळे किंवा दुसऱ्यांनी केलेली स्तुती यांनी होत नाही, तर आपल्या हातून काही लक्षात ठेवण्यासारखे सत्कृत्य झाले तरच होतो.

254. थोर मनुष्यच दुसऱ्या थोर व्यक्तीला आकर्षू शकतो. गुणी माणसाला गुणांची किंमत कळते व दुसऱ्या माणसाबद्दल आपुलकी वाटते.

255. पाहिलेल्या पावसाळयापेक्षा अनुभवलेले पावसाळे अधिक महत्वाचे असतात.

256. संकटांची जितकी पत्रास राखावी, तितकी ती अधिकाधिक मिजासखोर बनत जातात.

257. मनाच्या जखमेला सहानुभूतिशिवाय औषध नाही. अश्रूंनीच हृदये कळतात आणि अश्रूंनीच हृदये मिळतात.

258. असामान्य माणसाची तीन लक्षणे असतात. तो गुणी असल्यामुळे त्याला चिंता त्रास देऊ शकत नाही; तो सुज्ञ असल्यामुळे त्याच्या मनात कोणत्याही प्रकारचा गोंधळ होत नाही आणि तो शूर असल्याने त्याला

259. कधीही भीती ग्रासत नाही.

260. कळकळ ही जीवनाची सुरूवात करते तर त्याग हा त्याचा शेवट करतो.

261. प्रीती म्हणजे केवळ क्षणिक वासनेची तृप्ती नव्हे ! माणसाला स्वत:पलीकडे पाहायला लावणारी उदात्त भावना आहे ती !

262. काही काही दु:खं एकट्यानंच सोसण्यात सुख असतं.

263. मृत्यूच्या छायेत माणसाचा आत्मा जागृत होतो हेच खरं.

264. वयानं मोठ्या झालेल्या माणसाचं सर्वात मोठं दु:ख हेच आहे की त्याला लहानासारखं मोकळेपणानं मनसोक्त रडता येत नाही !

265. जी भक्तीचं रूप घेऊ शकते तीच खरी प्रीती.

266. प्रतिभा ही अनंत परिश्रमात सामावलेली असते.

267. माणुसकीची वाढ म्हणजे सुधारणा.

268. भक्ती हे सोंग नाही, मन सुधारण्याचा तो एक मार्ग आहे.

269. निष्ठेने जे आपली कार्ये करतात: ते परमेश्वराच्या विकासत्वाला अनुसरून उन्नती पावतात.

270. ज्वाळांनी जळू शकत नाही, संकटाने पडू शकत नाही, स्वार्थाच्या विचाराने पोखरलं जात नाही, त्याला घर म्हणतात.

271. मुलांना अक्कल येण्याचे वय येते, तेव्हा मोठ्यांची अक्कल गेलेली असते.

272. मनुष्याची मुद्रा म्हणजे जीवनग्रंथ. डोळे म्हणजे तर जीवनातील अनुभवाने भरलेले डोह.

273. ओठातून उच्चारल्या जाणाऱ्या सहानुभूतीच्या सहस्त्र शब्दांपेक्षा मदतीसाठी पुढे आलेला एक हात अधिक श्रेष्ठ !

274. गरूडाचे पंख लावून चिमणी पर्वताचं शिखर गाठू शकेल का?

275. उदात्त दु:ख हेच क्षुद्र दु:खावरचं या जगातलं उत्कृष्ट औषध आहे.

276. प्रत्येक काळया ढगाला रूपेरी किनार असते हे विसरू नका.

277. प्रत्येक वस्तूंत आणि व्यक्तीत सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व यापैकी काही ना काही लपलेलं असतं.

278. भीती म्हणजेच सुरक्षिततेचा पाया.

279. भिंतींना कान असतात आणि कुंपणांना डोळे असतात.

280. एखादे लहानसे छिद्रदेखील विशाल जहाजाला बुडविते.

281. साधू किंवा संत सद्‌गुणांचे आचरण अशा रीतीने करतो, की ते कुणासही आकर्षक वाटावे.

282. रिकामं पोतं सरळ उभं राहू शकणारच नाही.

283. उघड दिसणारे वैभव साधूलाही मोहात पाडू शकते.

284. मोठा मासा लहान माशाला गिळतो.

285. हिरा हिऱ्यालाच कापू शकतो.

286. साम्राज्यापेक्षाही समाधानाची किंमत जास्त आहे.

287. माणसाचं मन मोठं विचित्र असतं. प्रेम आणि अहंकार, आशा आणि भीती यांचा पाठशिवणीचा खेळ तिथं अष्टौप्रहर चालतो. तो खेळ कधी संपत नाही आणि माणसाचं दु:ख कधी कमी होत नाही.

288. प्रेम हा जुगार आहे. माणसाचा जीव घेणारा जुगार आहे.

289. देशभक्ताचं रक्त म्हणजे स्वातंत्र्य-वृक्षाचे बीजच होय.

290. माणूस जर स्वत:च किड्याप्रमाणे राहू लागला, तर त्याने दुसऱ्याने आपल्याला तुडविले म्हणून कुरकुर करत बसू नये.

291. बुध्दी आणि भावना यांचा समन्वय म्हणजेच विवेक.

292. जो मूळचाच सद्‌गुणी असतो, त्यावर दुर्गुणाचा काहीही परिणाम होत नाही.

293. जीभ ही तीन इंच लांबीची खरी! पण तिच्यात सहा फूट माणसाला मारण्याचे सामर्थ्य असते.

294. धावत्या पाण्याला अचूक मार्ग सापडतो.

295. अत्तर तयार व्हायला फुलं सुगंधी असावी लागतात.

296. जितकी माणसं तितकी दु:खं! काही दु:ख उघड उघड दाखविता येतात. काही काळजात खोल खोल लपवावी लागतात.

297. भावना बुध्दीपेक्षा अधिक हट्टी असते. युगायुगांचे संस्कार तिच्या कणाकणात भिनलेले असतात.

298. म्हातारपण व मृत्यू यांच्या वेगवान प्रवाहात वाहत जाणाऱ्या जीवांना धर्म हा दीपगृहासारखा आहे. धर्माचरणानेच उत्तम प्रतिष्ठा व सद्‌गती लाभते.

299. जखमांची भरपाई न्यायाने करा: निष्ठुरतेची भरपाई प्रेमाने करा.

300. नीतीचा खून समाजाला पाहवत नाही! पण माणसाचा खून तो हसतमुखाने पाहतो. माणसासाठी नीती असते. नीतीसाठी माणूस नसतो.

301. प्राप्तीपेक्षा प्रयत्नांचा आनंद विशेष होय.

302. मनुष्याच्या आत्म्याला पंख आहेत: शरीराला नाहीत. त्या शरीरानं पृथ्वीवरच चाललं पाहिजे. खडेकाटे, खाचखळगे, जीवजिवाणू हा सारा जीवनाचा भाग मानून त्यानं जगलं पाहिजे.

303. लग्न हा करार नसून संस्कार आहे.

304. संसाराच्या नौकेला नवरा शिडासारखा तर बायको सुकाणूसारखी असते.

305. निसर्ग जितका कोमल तितकाच क्रूर आहे.

306. कुठल्याही संकटसमयी मनुष्य आपल्या ध्येयापासून ढळला तर तो जिवंत असून मेल्याप्रमाणे आहे.

307. पाणी पर्वतात राहू शकत नाही, त्याचप्रमाणे सूडाची भावना थोर पुरूषाच्या हृदयात राहू शकत नाही.

308. मनुष्याची मुद्रा म्हणजे त्याचा जीवनग्रंथ. जीवनाच्या अनेक अनुभवाच्या रेषा उमटलेल्या असतात. काही रेषा अस्पष्ट तर काही खोल असतात.

309. गौरव हा पडण्यात नाही; पडून उठण्यात आहे.

310. चालीरीती म्हणजे सद्‌गुणांच्या पडछाया.

311. परिस्थितीच्या अधीन होण्यापेक्षा परिस्थितीलाच आपल्या इच्छेप्रमाणे वाकविले पाहिजे. निदान तसा प्रयत्न तरी केला पाहिजे.

312. जीवन ही लढाई आहे, जीवन हा यज्ञ आहे, जीवन हा सागर आहे. प्रीति आणि पराक्रम हेच जीवनाचे डोळे !

313. जगातील वाईट माणसं खाण्याकरिता जगतात आणि चांगली माणसं जगण्यासाठी खातात.

314. सत्य हे ताकातील लोण्यासारखे असते, खाली ढकलले तरी ते थोड्याच वेळात पृष्ठभागावर येऊन तरंगते.

315. अहंकार व लोभ हे माणसाच्या नव्व्याण्णव टक्के दु:खाचे कारण आहेत.

316. विचार हा जनक आणि शब्द हा त्याचा पुत्र.

317. राखेच्या ढिगाऱ्याखाली ठिणगी विझून जावी तसं अनेकातलं देवत्व हळू हळू निस्तेज होत जातं.

318. देवाने एक दरवाजा बंद केला, तरी तो हजारो दरवाजे उघडतो.

319. सद्‌गुणाकरिता नेसलेली चिंधीदेखील बादशाही थाटाची बनते.

320. याचना हे आयुष्यातलं सर्वात अवघड वक्तृत्व आहे.

321. जीवनाचे मुखवटे तेवढे दर पिढीला बदलतात, पण त्याचा आत्मा एकच असतो.

322. तोंडातून बाहेर न पडलेल्या शब्दांवर आपली सत्ता असते. तोंडातून शब्द बाहेर पडले की त्यांची तुमच्यावर सत्ता चालते.

323. मागितल्याशिवाय मिळणारी गोष्ट दुधाप्रमाणे असते. मागितल्यानंतर मिळणारी गोष्ट जलासमान असते आणि बळजबरी करून लाभते ती रक्तासमान असते.

324. काळासारखा धन्वंतरी दुसरा कोणी नाही. दुभंगलेले हृदय कसे जोडावे आणि वठलेले झाड कसे पालवावे, हे त्याला कळत असते.

325. दंभ म्हणजे दुर्गुणांनी सद्‌गुणांना दिलेला मान होय.

326. सर्व काही गेल्यावर आपल्याजवळ जे काही उरते त्याला अनुभव म्हणतात.

327. आत्म्याची सुधारणा हा सर्व सुधारणांचा आत्मा आहे.

328. जे नंतर चांगले वाटते ते कृत्य `नैतिक' आणि जे कृत्य नंतर दु:खकारक ठरते ते `अनैतिक'.

329. पृथ्वीतलावरील दु:खे ही जीवनात नसतात, तर ती दु:खे संकुचित दृष्टीने पाहणाऱ्या मानवाच्या मनात असतात.

330. हेतू, परिणाम आणि स्वरूप ही तिन्ही पाहून कर्माची योग्यता ठरवावी.

331. दुष्टाससुध्दा शक्ती असू शकते आणि तो मोहक स्वरूप धारण करू शकतो.

332. आपण जे सत्य शोधीत आहो, ते या जगात आहे. अगदी आपल्यापाशीच आहे. पण ते आपल्याला दिसत नाही, कधीही दिसणार नाही. त्याच्या सुवासानं धुंद होऊन ते धुंडून काढण्याकरिता धावत सुटता, याचंच

333. नाव जीवन !

334. लहान मुलांचं सुखदु:खाचं जग किती चिमणं असतं. जणू काही चिमणीचं घरटंच ! मात्र त्या घरातल्या कापसाला मुलांच्या दृष्टीनं सिंहासनापेक्षा अधिक महत्व असते.

335. खरं काव्य प्रणयाच्या पहिल्या फुलोऱ्यात नाही. ते संसारात, त्या फुलांच्या निर्माल्यात आहे. ते सुखदु:खांच्या संमिश्र अश्रूत आहे.

336. शंभर गोष्टी बोलण्यापेक्षा एक गोष्ट प्रत्यक्षात आणणारा श्रेष्ठ होय.

337. आयुष्याच्या लढाईत पुष्कळ वेळा नको असलेल्या अनेक तहांवर माणसाला सही करावी लागते.

338. सेवा जवळून, आदर दुरून आणि ज्ञान आतून असावे.

339. मोठी माणसे व छोटी मुले यांना जोडणारा एक पूल म्हणजे खेळकरपणा होय.

340. कशात तरी रमून गेल्याशिवाय माणूस सुखी होऊ शकत नाही.

341. मानवी जीवनाचे कीर्ती, पराक्रम, प्रतिभा, संपत्ती इत्यादी वस्त्रालंकार आहेत पण त्याचा आत्मा म्हणजे प्रेम, वात्सल्य, भूतदया इत्यादी भावना होय.

342. कल्पकता ही शुक्राच्या चांदणीसारखी असते.

343. मरणात खरोखर जग जगते । आधि मरण, अमरपण मग येते ।

344. आशेची मंदिरे म्हणजे वाळूतले किल्ले होत.

345. पुस्तकातल्या साऱ्या खुणा पुस्तकातच राहतात. पण ज्यातल्या खुणा आपण कधीही विसरत नाह ी अाएकच ग्रंथ आहे, आणि तो म्हणजे जीवन !

346. चाळीशीच्या अलिकडे मनुष्य शूर वीर असतो, पण ती उलटताच तो मुत्सद्दी बनतो.

347. आयुष्य ही एक अकल्पित प्रसंगांची मालिकाच आहे.

348. सत्य हे कित्येकदा कल्पित कथेपेक्षाही चमत्कृतिजनक असते.

349. दुसऱ्याचे दुःख कळायला आधी त्याच्याबरोबर जळायला हवं.

350. जग ही एक मयसभा आहे. जगाचा अनुभव हा एक आरसा आहे.

351. श्रद्धेची मुळे हृदयात असतात, जिभेच्या टोकावर नसतात.

352. चेहऱ्याप्रमाणे माणसाच्या अक्षरावरही काळचा परिणाम होत असतो.

353. कीर्ती ही पाण्यात खडा टाकल्याबरोबर उत्पन्न होणाऱ्या बुडबुड्याप्रमाणे असते.

354. कीर्तीचे फूल आज ना उद्या सुकत असेल, पण ते फुलत असताना मिळालेला उन्मादक आणि संजीवक सुगंध मात्र चिरंतन असतो.

355. वस्त्रांनी मनुष्याच्या शरीराचे, फुलांनी केसांचे तर सुभाषितांनी मनाचे सौंदर्य वाढते.

356. सुभाषितांची आवड ही मनाला लागलेली पूर्णत्वाची तहान होय.

357. आदर व आवड ही भावंडे असली तरी त्यांच्या स्वभावात मात्र महदंतर आहे.

358. चांदणे जगाला सुंदर करते पण अंधार त्याला एकजीव करतो.

359. आयुष्य हे एक पारिजातकाचे झाड आहे. त्यावर चिमुकली, क्षणात कोमेजून जाणारी पण विलक्षण सुगंधी अशी अगणित फुले नेहमी फुलत असतात.

360. कल्पना हे काव्याचे शरीर आहे तर कर्तृत्व हा त्याचा आत्मा आहे.

361. ऐन पंचविशीत मनुष्याला आयुष्य हा फुलांच्या पायघड्यांवरचा प्रवास वाटतो.

362. दिवस मनुष्याला यंत्र बनवतो तर रात्र त्याला काव्यमय करून सोडते.

363. काव्य व शास्त्र यांचा मधुर संगम म्हणजेच मनुष्याचे जीवन होय.

364. अहंकार हा जीवनाचा आवश्यक भाग, पण तो पावसासारखा असतो.

365. अहंकाराचा अभाव हा माणसाला दगड बनवितो, तर अहंकाराचा अतिरेक हा माणसला हिंस्र पशू बनवितो.

366. जसा मित्र निवडावा तसाच लेखकही निवडावा.

367. आदर्शाची गती वरवर असते तर शिष्टाचाराची गती खाली असते.

368. काल हाच सर्वोत्तम उपदेशक आहे, त्याच्या सल्ल्याने चाला.

369. सल्लामसलतीचा विश्वास हा माणसामाणसातील सर्वात श्रेष्ठ विश्वास आहे.

370. धर्म अनेक असतात, पण नीतिमत्ता एकच असते.

371. देवमाणूस होण्यापेक्षा माणूस म्हणून जगण्यातच सार्थक आहे.

372. जीवनाच्या वेलीला कागदी फुले चिकटविण्यापेक्षा ती आपोआप कशी फुलेले ते बघावे.

373. शेरभर कल्पनेपेक्षा गुंजभर अनुभव अधिक महत्वाचा.

374. धर्माचे आचरण करायला मनाचे फार मोठे सामर्थ्य लागते. ते बुद्ध, ज्ञानेश्वर, रामदासांच्या अंगी होते.

375. भावनाशील मनुष्य जीवनप्रवाहात पोहत जातो. तो प्रवाहपतित कधीच होणार नाही.

376. मनुष्य म्हातारा झाल्यावर त्याच्या चेहऱ्यावर लहान मुलाप्रमाणे वेड्यावाकड्या रेघोट्या ओढण्याची काळपुरुषाला जरी लहर येत असली तरी चेहऱ्याचे वैशिष्ट्य काही त्याला नाहीसे करता येत नाही.

377. जगाच्या बाजारात उपदेशच अधिक स्वस्त असतो.

378. जी माणसं सुदैवानं डोंगरावर चढतात ती दरीत उतरतच नाहीत.

379. सत्य हे कल्पनेहूनही विचित्र असते.

380. जाळावाचून नाही कड । मायेवाचून नाही रड ।

381. संपत्तीने अमृतत्व प्राप्त होत नाही.

382. ज्याने वेळ घालविला त्याच्याजवळ गलवायला दुसरे काही उरत नाही.

383. मनुष्यातला देव प्रकट होतो तो परांच्या गाद्यांवर लोळून नव्हे तर काट्याकुट्यातून धावत जाऊन !

384. माणसाला जे पाहण्याचे धाडस होत नाही तेच त्याच्यापुढे आणून उभे करण्यात दैवाला मौज वाटते.

385. वियोगावाचून प्रीती फुलत नाही.

386. जो स्वत: दानधर्म करतो आणि दुसऱ्यांनीही करावा असे इच्छितो तो सात्विक.जो लवकर रागावत नाही पण शांत होतो, तो सात्विक. जो कोणी, तुझे ते तुझे आणि माझे तेही तुझे असे म्हणतो तो सात्विक.

387. जीविताचे कोडे हे केवळ सुखाच्या मार्गाने सुटत नाही, दु:खही भोगले तरच आयुष्याचा अर्थ स्पष्ट समजतो.

388. सुखदु:खाच्या लंपडावातच जीवनाचा खराखुरा आनंद आहे.

389. व्देषाला सहनुभूतीने आणि निष्कपटतेने जिंका.

390. माणूस शक्तिमान असल्यास इतर माणसे त्याला वश होतात व तो जर शक्तिमान नसला तर ते त्याचे शत्रू होतात.

391. सचोटीचा मनुष्य निर्माण करणे हीच परमेश्वराची उदात्त कलाकृती होय.

392. कोणतीही वस्तु चांगली वा वाईट नसते. फक्त आपले विचार तिला तसे रूप देतात.

393. मिळालेल्या आनंदाचा आस्वाद घ्यावा. गमावलेल्या सुखासाठी हळहळण्यात मन गुंतवणं व्यर्थ होय.

394. मोती होऊन सुवर्णाच्या संगतीत राहण्यापेक्षा दंवबिन्दू होऊन एखाद्या तहानलेल्याची तहान भागवणे अधिक श्रेष्ठ होय.

395. स्नेहाचा एक कटाक्ष दु:खी हृदयाला कुबेराच्या संपत्तीपेक्षा अधिक मोलाचा असतो.

396. खऱ्याला केव्हाही मरण नाही नि खोट्याला शंती नाही.

397. बुध्दीने कळते पण कृतीशिवाय वळत नाही.

398. चांगली वागणूक हा यशोमार्गाचा पहिला टप्पा आहे.

399. लोक जितके हुशार आणि कारागीर, तितक्या कृत्रिम गोष्टी जास्त.

400. सुवचन श्रवणाने शहाणपण तर दुर्वचन बोलण्याने पश्चाताप करण्याची पण पाळी येते.

401. तारूण्य म्हणजे चुका, प्रौढत्व म्हणजे लढा आणि वृध्दत्व म्हणजे पश्चाताप.

402. शुध्द भक्ती हे सोंग नसून मन सुधारण्याचा तो एक मार्ग आहे.

403. नियम अगदी थोडा असावा, पण तो प्राणपलीकडे जपावा.

404. हक्कासाठी झगडण्यापेक्षा कतर्व्याशी प्रामाणिक राहा.

405. जो लवकर रागावतो व लवकर शांत होतो, त्यास हानी कमी व लाभ अधिक.

406. जो द्रव्य वाढवितो तो काळजी वाढवतो, परंतु जो विद्या वाढवितो, तो ज्ञान वाढवतो.

407. अपराध्याला क्षमा करणे चांगले, विसरणे तर त्याहूनही उत्तम.

408. बौध्दिक स्वातंत्र्य संपादणे व धैर्याने त्याचा उपयोग करणे हे प्रगतीचे मूळ होय.

409. माणसे जन्माला येता पण माणुसकी निर्माण करावी लागते.

410. मोहपाशमुक्त झाल्यानेच मनुष्याला देवत्व प्राप्त होते.

411. वासना मोकाट सुटली तर ती स्वत:च स्वत:ची राखरांगोळी करून टाकणारी ज्वाला बनते.